वर्ष १० वे  विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27  संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२०  वार-शनिवार दि. २६ सप्टेंबर २०२५ पाने ४ किंमत ३


# नेकनूरच्या माजी सरपंच सौ.रोहिणी काळे यांच्याकडून अडीच कोटी वसूल करण्याचे विभागीय आयुक्तांचे आदेश

## त्यांच्या कार्यकाळात झालेल्या अनियमितता तपासून अपहाराची रक्कम निश्चित करून वसूल पात्र रक्कम शासन खाती भरण्याची कारवाई मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बीड यांना निर्देशित करण्यात आले

## दिव्य वार्ताचा लढा यशस्वी झाला आणि भ्रष्टाचारही सिध्द झाला



बीड, (दिव्य न्युज):– नेकनूरच्या ग्रामपंचायतीमध्ये मागील दोन वर्षात विविध विकास कामात बोगसगिरी करत सर्वच कामात भ्रष्टाचार करून कोट्यावधी रूपयांचा निधी हडप करण्यात आला होता. यामध्ये नेकनूरच्या तत्कालीन सरपंच सौ.रोहिणी परमेश्वर काळे यांच्या कार्यकाळात दोन ग्रामसेवकांनी त्यांच्याशी संगनमत करत शासनाच्या विविध निधित गैर कामेकरत करोडो रूपयांचा निधी हडप केला होता. या प्रकरणात दिव्य वार्तानी आवाज उठविला आणि जिल्हा प्रशासनाकडे रितसर तक्रार दाखल करण्यात आली.



१. सिमेंट रस्ते नाली बांधकाम–रू.२७ लाख १३ हजार १५०
२. शाळेसाठी पाणी पुरवठा –३ लाख ६९ हजार १००
३.धुर फवारणीवर खर्च – ४९ हजार
४. अंगणवाडी डिजिटल करणे खर्च –३ लाख ७५ हजार
५. अंगणवाडी साहित्य खरेदी– २ लाख ९७ हजार ३१
६. ग्रामपंचायत कार्यालय रंगरंगोटी करणे– ६४ हजार
७. सबमशिबल पंप खरेदी – ४ लाख ५० हजार
८. शाळा व अंगणवाडी साठी एलसीडी खरेदी – ३ लाख ७५ हजार ,३ लाख ९०हजार, ७ लाख ६५ हजार
९. स्वच्छता व साफ सफाईवर खर्च– १ लाख ६०हजार
१०. औषध खरेदीवर खर्च – ९० हजार
११. ग्रा.पं.करीता फर्निचर खरेदी – २ लाख
१२. स्टील रेलींग बसविणे खर्च – २ लाख
१३. समर्शिबल पंप खरेदी – १ लाख ४४ हजार ,५ लाख ९६ हजार ८ रू
१४. टिव्ही संच खरेदी करणे– १ लाख ६४ हजार, २ लाख ९९ हजार, ७९ हजार ३७८, ५ लाख ४२ हजार ३७८
१५. एलईडी टिव्ही खरेदी / अंगणवाडी व जि.प. शाळा– ५ लाख ९६ हजार ८ रू
१६. शेतकरी सहल दाखवत केलेला खर्च – १ लाख
१७. आरोग्य शिबीरावर खर्च – १ लाख
१८. फॉगिंग मशिनीवर खर्च – २ लाख ५० हजार
१९. ४० एचपी पाणी पुरवठा मोटार खरेदी व फॅड वॉश खरेदी – २ लाख ९९ हजार
२०. कचरा कुंडी खरेदी – २ लाख ८७ हजार ६४०

दिलेल्या तक्रारीच्या आधारे तत्कालीन पंचायत समितीचे गटविकास अधिकाऱ्यांनी सात सदस्यीय समिती गठीत करून या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्या आदेशानुसार नेकनूर गावात जावून त्या सात सदस्यीन समितीने सर्व कामांची सखोल चौकशी करत आपला अहवाल गटविकास अधिकारी पंचायत समिती बीड यांना दिला होता. त्या अहवालावरून गटविकास अधिकारी यांनी दि.१७/०८/२०२३ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बीड यांच्याकडे सादर केला होता. त्या अहवालावरून मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बीड यांनी आपल्या दालनात सुनावणी घेतली,तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेतले. सरपंच सौ.रोहिणी काळे यांचेही म्हणणे ऐकून घेतल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.बीड यांनी आपला अहवाल विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे सुर्पूद केला होता. त्या अहवालावरून विभागीय आयुक्तांनी सुनावणी घेतली, तक्रार दाराचे म्हणणे ऐकून घेतले आणि सरपंच सौ.रोहिणी काळे यांच्या वतीने ॲड.एम.एस. कराड यांनी आपला युक्तीवाद केला होता. सर्वाचे ▶▶ पान २ वर









Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

### जिल्ह्यात पावसाचा हाहाकार, बिंदूसरा नदीला महापूर, शहरात पाणीच पाणी..

# बीडवर आभाळ फाटलं

## मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान, आता शासनाची खरी परिक्षा

बीड (दिव्य न्युज):– जिल्ह्यात दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर काल मध्यरात्रीपासून जोरदार पावसाला सुरूवात झाली. रात्रभर कोसळल्यानंतर आज सकाळपासून सुध्दा सर्वत्र अतिवृष्टी सुरू आहे. पावसाचा जोर वरचे वर वाढत असुन बिंदुसरा, सिंदफणा, मांजरा, गोदावरी यासह इतर नद्यांनाही पुर आला आहे. अनेकठिकाणी घरांमध्ये पाणी शिरून प्रचंड नुकसान झाले आहे. नद्या– नाल्यांना पुर आल्याने आता पुराचे पाणी गल्ली बोळात आणि घरात घुसू लागले आहे. बीड शहरातील बिंदुसरा नदीला पुर आला असून दगडी पुल पाण्याखाली गेला आहे. नदीचे पाणी वाढत असून नदीकाठच्या रहिवाशांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. ▶▶ पान २ वर



## मुडेगाव येथे भिंत कोसळून दोनजण जखमी, अंबाजोगाईतील घटना

अंबाजोगाई, (दिव्य न्युज):– अंबाजोगाई तालुक्यातील मुडेगाव येथे एका घराची भिंत कोसळून दोघेजण जखमी झाले आहेत. जखमी मध्ये एक महिला तर एका पुरुषाचा समावेश आहे. मुडेगाव या गावात अंबाबाईचे मंदिर आहे. याच मंदिरात दर्शनासाठी संदीपान अडसूळ आणि शेशाबाई जगताप हे दोन गावकरी दर्शनासाठी जात ▶▶ पान २ वर







## दोन दिवस अतिवृष्टीचा अंदाज; पोलीस आणि स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात रहा–एसपी काँवत

बीड जिल्ह्यात सध्या पावसाचा जोर वाढत आहे. पुढील दोन दिवस अतिवृष्टी होण्याचा अंदाज असुन सर्वांनी पोलीस प्रशासन व स्थानिक शासकीय यंत्रणेच्या संपर्कात रहावे आणि स्वत:ची काळजी घ्यावी असे आवाहन पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी केले आहे. कोणत्याही मदतीसाठी मोबाईल क्रमांक ९२२५०९२८०० या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी केले आहे.







## नागरिकांना आवाहन

कृपया अधिकृत सूचनांचे पालन करा., धोकादायक भागात जाणे टाळावे., पुर प्रवण क्षेत्रात जाणे टाळावे.,वीजा पडत असताना झाडाखाली थांबणे टाळावे. पुरापासुन बचावासाठी अत्यावश्यक सर्व बाबींची काळजी घ्यावी. पुराच्या आपत्तीपासुन वाचण्यासाठी स्थानिक निवारा केंद्राचा सहाय्य घ्यावे. पुरपरिस्थितीत अनावश्यक पर्यटन टाळावे. पुरपरिस्थितीत नदी नाल्यांच्या पुलावरुन पाणी जात असताना, रस्ता ओलांडु नये अफवांवर विशास ठेवू नका.

# गोमांस प्रकरणात खळबळ!

# नितेश राणेंच्या विश्वासूसह भाजपच्या मंडल अध्यक्ष आणि तिघांना पोलिस कोठडी

मुंबई , (दिव्य न्युज):- भाजप नेते मंत्री नितेश राणे पालकमंत्री असणाऱ्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात पोलिसांनी भाजप पदाधिकाऱ्यासह नगराध्यक्षावर मोठी कारवाई केली आहे. पोलिसांनी नगराध्यक्षांसह ६० जणांवर गुन्हे दाखल केले असून पाचजणांना अटक केली आहे. तर अन्य फरार असून त्यांचा शोध घेतला जात आहे. नगराध्यक्षांसह इतरांनी गोमांस वाहतूक करत असल्याच्या संशयावरून तिलारी - पाताडेश्वर मंदिराजवळ एका तरुणाला जबर मारहान केली होती. ज्यात तो जखमी झाला होता. तसेच त्या तरूणाची कार देखील पेटवून देण्यात आली होती. या प्रकरणात दोडामार्ग पोलिसांत गुन्हा नोंद झाला होता.

या प्रकरणी मिळालेली माहिती अशी की, गुरुवारी दुपारी निजामुद्दीन मोहम्मद सय्यद कुरेशी हा आपली कार घेवून तिलारी घाटमाथ्यावरून दोडामार्गकडे येत होता. यावेळी वीजघर चेकपोस्टवर त्याची कार तपासणी करण्यात आली. यावेळी पोलिसांना त्याच्या कारमध्ये मांस सापडले. यावेळी वरिष्ठांच्या आदेशानुसार, पोलिसांनी कुरेशी आणि कार गाडी पोलिस ठाण्यात पुढील चौकशीसाठी नेण्याची कारवाई केली.ही कारवाई करत असतानाच तिलारी - पाताडेश्वर मंदिराजवळील ५० ते ६० जणांच्या जमावाने त्यांची कार रस्त्यावर अडवली. नगराध्यक्ष चेतन चव्हाण, भाजप दोडामार्ग मंडल अध्यक्ष दीपक गवस आणि इतरांनी गोमांस वाहतूक करत असल्याच्या संशयावरून बेभान होत कारवर जोरदार हल्ला चढवला.



कारच्या काचा फोडून तोडफोड केली. कारमधून गोमांस वाहतूक करण्यात येत आहे, याला मारा. पेट्रोल आणा, याला पेटवून द्या, कार पेटवा, असे म्हणत कुरेशी याच्यावर हल्ला केला. त्याला जबर मारहाण करण्यात आली. तसेच जमावाने कारवर पेट्रोल टाकून ती पेटवून दिली. या घटनेदरम्यान पोलिस कॉन्स्टेबल परशुराम सावंत घडनास्थळी उपस्थित होते. त्यांच्या तक्रारी नुसार जमाव बनवून शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर प्रकरणात भाजप मंडल अध्यक्ष दीपक गवस, नगराध्यक्ष चेतन चव्हाण, महेंद्र खरवत, वैभव रेडकर, विजय कांबळे व इतर ६० अज्ञातांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाजप मंडल अध्यक्ष दीपक गवस, नगराध्यक्ष चेतन चव्हाण, महेंद्र खरवत, वैभव रेडकर, विजय कांबळे यांना न्यायालयात हजर केले असता त्यांना दोडामार्ग न्यायालयाने पाच दिवस पोलिस कोठडी सुनावली आहे, अशी माहिती पोलिस निरीक्षक हेमचंद्र खोपडे यांनी दिली आहे.या घटनेमुळे दोडामार्ग तालुका मुख्यालयाच्या इमारतीला पोलिस छावणीचे स्वरुप आले होते. या घटनेची माहिती मिळताच कोकण परिक्षेत्राचे पोलिस महानिरीक्षक संजय दराडे व पोलिस अधीक्षक डॉ. मोहन दहिकर तात्काळ दोडामार्ग येथे दाखल झाले होते. तसेच दंगल पथक नियंत्रकांसह मोठा पोलिस फौजफाटा तैनात करण्यात आला होता.

# शनि शिंगणापूर मंदिर कार्यालयास ठोकले सील

## पोलिस बंदोबस्तात कलेक्टरांकडून 'देऊळ कार्यालय बंद'

अहमदनगर, (दिव्य न्युज):- कर्मचारी भरतीमधील अनियमितता, कोट्यवधी रुपयांचा ऑनलाईन ॲप घोटाळा अन् आर्थिक घोटाळ्याचे मुद्दे चर्चेतील अन् देशभरातील प्रसिद्ध अहिल्यानगरमधील श्री शनैश्वर देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त मंडळ राज्य सरकारने बरखास्त केल्यानंतर आज जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी देवस्थान ट्रस्ट कार्यालयाला भेट देत पदभार स्वीकारला.यानंतर लगेचच, जिल्हाधिकाऱ्यांनी देवस्थान ट्रस्टचे कार्यालय सील करण्याची कारवाई करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: पोलिस बंदोबस्तात हे कार्यालय सील केल्याने खळबळ उडाली. ही कारवाई करताना, स्थानिक आमदार विठ्ठल लंघे आणि तक्रारदार उपस्थित होते.

शनिशिंगणापूर इथले श्री शनैश्वर देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त मंडळ बरखास्त करण्यात आल्याचा आदेश सोमवारी रात्री उशिरा काढण्यात आला. उपविधी सल्लागार व उपसचिव सागर ज. बेंद्रे यांच्या सहीने हा आदेश निघाला. राज्य सरकारच्या या कारवाईमुळे एकच खळबळ उडाली. यानंतर तब्बल पाच दिवसानंतर जिल्हाधिकारी यांनी देवस्थान ट्रस्ट कार्यालयाला भेट दिली.सरकारने अधिनियम सन २०१८मध्ये केलेल्या अधिनियमातील कलम ५च्या उपकलम (१) अन्वये शनैश्वर देवस्थान ट्रस्टचे व्यवस्थापन आता नव्याने 'श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्त व्यवस्था व्यवस्थापन समिती' अशी तरतूद केली आहे. यामुळे अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी यांची प्रशासक म्हणून तात्पुरती नियुक्ती सरकार केली. जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी आज देवस्थान कार्यालयात भेट पाहणी केली. देवस्थानवरील विश्वस्त मंडळ बरखास्त झाल्यानंतर इथं कागदपत्रांची हेराफेरी केली जात असल्याची बाब समोर आली होती. याची गंभीर दखल घेत, जिल्हाधिकारी यांनी देवस्थानमधील कार्यालय सील करण्याचा निर्णय घेतला.विश्वस्त



मंडळातील सदस्यांकडून मंदिर देवस्थान ट्रस्टसंदर्भात झालेल्या भ्रष्टाचारांच्या आरोपांचे पुरावे नष्ट केले जाऊ नये यासाठी जिल्हाधिकारी यांनी प्रमुख कार्यालय सील केल्याची कारवाई केल्याची चर्चा रंगली होती. शनि शिंगणापूर देवस्थान कार्यालय सील करताना कार्यकारी अधिकारी मात्र उपस्थित नव्हते. त्यामुळे चर्चेतला अधिकच तोंड फुटले. जिल्हाधिकारी पुढ कारवाईचे काय पाऊल उचलणार याची चर्चा होती.

**भ्रष्टाचाराचा पाठपुरावा करत राहू**

आमदार विठ्ठल लंघे यांनी, अनेक कार्यकर्ते व संघटनेने शनैश्वर देवस्थानमधील भ्रष्टाचार व ऑनलाइन ॲप घोटाळ्याचा पाठपुरावा केलेला आहे. येथील नोकर भरती, अनियमितता व त्रुटींबाबत आम्ही विधानसभेत लक्षवेधी मांडली होती. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री व पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यामुळे यशप्राप्ती झाल्याचे सांगितले.

**संगनमताने लूट, फौजदारी कारवाई करणार**

भारतीय जनता पक्षाचे ऋषिकेश शेट यांनी राजकीय कामाकरिता घेतलेल्या सर्व सहा हजार रुपये पगारावरील कर्मचाऱ्यांनी तातडीने राजीनामे द्यावेत, अन्यथा संगनमताने देवस्थान लुटले म्हणून सर्वांवर फौजदारी गुन्हे दाखल करणार असल्याचा इशारा दिला.

**दरंदले पुण्याला, जिल्हाधिकाऱ्यांचा निरोप**

शनैश्वर देवस्थान ट्रस्टचे कार्यालयीन अधीक्षक लक्ष्मण वाघ यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी आज प्रशासक म्हणून पदभार स्वीकारला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी जी. के. दरंदले रुग्णालय तपासणी करिता पुण्यास गेलेले आहेत. दरंदले हजर होण्यास आल्यानंतर मला भेटण्यास सांगा असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

**सात विभाग सील**

जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार श्री शनैश्वर देवस्थान ट्रस्टमधील स्थापत्य विभाग, कार्यालयीन अधीक्षक, आवक-जावक विभाग, लेखा विभाग, संगणक विभाग, रेकॉर्ड विभाग आणि आस्थापना विभाग असे सात विभाग सील करण्यात आले आहेत.

# स्वत:ला आणि मुलांना नदी नाले पासुन दुर ठेवा-खुर्शीद आलम

बीड, (दिव्य न्युज):- सध्या पावसाळा सुरू असुन सर्वत्र कडे जोरदार मुसळधार पाऊस सुरू आहे त्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्वच लहान मोठे तलाव भरलेले आहेत त्यामुळे थोडे जरी पाउस पडले की नदी नालेंना पुर येत आहेत. नदी नाले तील पाणी पहाण्यासाठी लोकं नदी नाले वर येऊन गर्दी करु लागले आहेत. विशेष करून बीड शहरातील बिंदुसरा नदी, मोमीनपुरा नाला, तकीया मस्जिद नर्सरी रोड नाला आणि बालेपिर नाला या नालेवर पुर परिस्थिती निर्माण झालेली आहे. गेल्या चार दिवसांपूर्वी बिंदुसरा नदी वरील दगडी पुलावरून एक मुलाचे संतोलन बिघडल्यामुळे तो पुलावरून नदीत पडला होता डूबक्या घेत असताना तेथील काही तरुणांनी पुरात



उड्या मारून त्या मुलाला वाचवण्यात यशस्वी झाले सदर मुलगा भाग्यवान होता म्हणून वाचला आहे म्हणून बीड शहरातील नागरिकांनी नम्र आवाहन करण्यात येते की आपण स्वःताला आणि मुलांना नदी नाले पासुन दुर ठेवावे असे नम्र आवाहन बीड नगरपरिषदेचे माजी सभापती तथा राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी केले आहे,

# लक्ष्मण हाके यांच्यावर हल्ला, गाडी फोडली!

नगर , (दिव्य न्युज):- ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांच्यार अहिल्यानगर जिल्ह्यात हल्ला झाला. पाथर्डी तालुक्यात असलेल्या ओबीसी समाजाच्या मेळाव्यासाठी जात असताना त्यांच्यावर अज्ञात तरुणांनी हल्ला केला. काठ्या घेऊन केलेल्या या हल्ल्यामध्ये हाके यांची गाडी फोडण्यात आली. विशेष म्हणजे हा हल्ला झाला तेव्हा लक्ष्मण हाके यांच्यासोबत पोलिस देखील होते.



अहिल्यानगर मधील बायपास रोडवर सारंगी हॉटेल जवळ हाकेंच्या गाडीवर हल्ला करण्यात आला. अहिल्यानगरमधील पाथर्डी तालुक्यातील दैत्य नांदूर या ठिकाणी ओबीसींची सभा होत आहे. त्या सभेसाठी हाके निघाले होते.दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी हाकेंचे नाव न घेता स्वतःच्या प्रसिद्धीसाठी स्वतःच्या गाडीवर हल्ला करून घेतली, असे म्हटले आहे.लक्ष्मण हाके यांनी शुक्रवारी फेसबूकवर पोस्ट करत आपले शत्रू वाढत जात असल्याचे म्हटले होते. त्यानंतर आज त्यांच्यावर हल्ला झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले होते की, मी प्रमाणिकपणे ओबीसींच्या हक्कासाठी भांडतो. एक मेंढपाळाचा मुलगा आहे. मी बॅनर छापू शकत नाही, गाडीला पैसे देऊ शकत नाही. ही माहिती असूनही तुम्ही मला साथ दिली.

पान ४ वरून

## नेकनूर सर्कल

पाहणीस उपस्थित होती. प्रत्यक्ष शेतात जाऊन त्यांनी नुकसानीचा आढावा घेतला. मात्र शेतकऱ्यांची वेदना अजूनही कायम आहे. पिकं सडली, मजुरी खर्च फुकट गेला, कर्ज कसं फेडायचं? असा प्रश्न शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला दिसतो. नुकसानीची नोंद घेऊन तातडीने शेतकऱ्यांना मदत मिळावी, अशी अपेक्षा स्थानिक शेतकरी व्यक्त करत आहेत. निसर्गाच्या लहरींनी उद्ध्वस्त झालेल्या या शेतकऱ्यांना शासनाने दिलासा देण्यासाठी ठोस पावलं उचलणं गरजेचं आहे, अन्यथा या भागातील शेतकऱ्यांचा संघर्ष अधिकच भीषण होणार, हे स्पष्ट दिसत आहे. या पार्श्वभूमीवर जबाबदार यंत्रणा कृतीशील होणार का ? असं प्रश्न शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

## धाकधूक मिटणार,

असल्याचे स्पष्ट केले आहे. सुरक्षित वाहतुकीसह बेरोजगारांना रोजगाराची संधी देण्यासाठी स्कूल व्हॅनला मंजुरी दिली आहे. नव्या स्कूल व्हॅनमधून विद्यार्थी वाहतुकीचा व्यवसाय सुरू करणाऱ्यांना राज्य शासनाकडून परवाने देण्यात येतील. राज्यात अत्याधुनिक सुरक्षा सुविधांनी युक्त स्कूल व्हॅन धावती करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे. सुरक्षित विद्यार्थी वाहतुकीसाठी केंद्र सरकारने स्कूल बस

## करपरा नदी

कॉलनीतील नागरीकांच्या शिष्टमंडळासोबत नगर परिषद बीडचे गटनेते फारुक पटेल, लोकसेना संघटना प्रमुख ड. प्रा. इलियास इनामदार युवा नेते सलीम खान यांनी अजित पवार साहेबांना निवेदन दिले सोबत बालेपीर भागातील नागरिक होते. उपमुख्यमंत्री मा ना अजित पवार साहेब यांची भेट घालून दिल्याबद्दल फारुक पटेल यांचे बालेपीर च्या नागरिकांनी आभार मानले.

## रिकाम्या जागांच

नकारात्मकतेचा, स्वार्थी स्वभावाचा आणि खोटेपणाचा परिणाम इतका खोलवर होतो की, आपण स्वतःला दोष देऊ लागतो. आणि मग लक्षात येतं रिकामं असलेलं चांगलं होतं, कारण ते शांत होतं. पण चुकीच्या माणसांनी भरलेली जागा आयुष्य उध्वस्त करून जाते.रिकामं असणं कधी कधी योग्य असतं.कारण त्यात खोटेपणा नसतो, अपेक्षांचा ओझं नसतं, आणि सर्वात महत्त्वाचं त्या रिकाम्या जागेत स्वतःला समजून घेण्याची आणि सुधारण्याची संधी असते. ती शांतता आपल्याला योग्य निर्णय घ्यायला शिकवते. चुकीच्या माणसांपासून दूर राहणं म्हणजे स्वतःवरचं प्रेम.कारण जे लोक सतत आपली किंमत कमी करतात, आपल्याला वापरतात किंवा आपल्यावर मानसिक भार टाकतात, ते आपल्यासाठी कधीच योग्य नसतात. अशा लोकांना नात्याचं नाव देणं म्हणजे स्वतःवर अन्याय करणं.जगायचं असेल तर एकटं चालेल, पण चुकीच्या माणसांच्या सावलीत नाही.जीवन हे आपल्या निवडींवर अवलंबून असतं. योग्य माणसं उशिरा भेटतील, पण त्यांच्या सहवासात आयुष्य फुलून येईल. तोपर्यंत, रिकाम्या जागांचं दुःख न करता त्यांचं मौन समजून घ्या,तेच तुमच्या खर्या सुखाचं प्रवेशद्वार असतं.

पान १ वरून

## नेकनूरच्या माजी सरपंच

म्हणणे ऐकून घेतल्यानंतर विभागीय आयुक्तांनी आपला निर्णय दिला असून यामध्ये त्यांनी तक्रारीतील १ ते २७ मुद्दे नमूद करून सदर प्रकरणात चौकशी करून अर्जदार व गैरअर्जदार यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेशी व वाजवी संधी देवून ग्रामपंचायतचा कार्यकाळ त्यामध्ये झालेली अनियमितता, गैरव्यवहार विचारात घेवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आपला निर्णय दिला आहे. त्यामध्ये त्यांनी आदेश पारित करत असे म्हंटले आहे की, प्रसतुत प्रकरणातील मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बीड यांचा अहवाल जा.क्रं.साप्रवि-७/ पं-चौ/कावि/४२७/२०२४/ क्रं.२२४२, दि.२८/०५/२०२४ मान्य येतो. गैर अर्जदार सौ.रोहिणी काळे तत्कालीन सरपंच ग्रामपंचायत नेकनूर ता.जि.बीड हे आज रोजी सरपंच पदावर कार्यरत नसल्या तरीही त्यांच्या कार्यकाळात प्रशासकीय व वित्तीय अनियमितता झालेली असल्याचे निष्पन्न होते. त्यामुळे सदरच्या अनियमितता तपासून अपहारित रक्कम निश्चित करून वसूल पात्र रक्कमा नियमानुसार वसून करून त्या शासन खाती भरण्याची कारवाई मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.बीड यांनी करण्याचे याद्वारे निर्देशित करण्यात येत आहे. सर्व संबधितांना सदरील आदेशाची प्रत कळवून प्रकरण या न्यायालयात बंद करण्यात येते व संचिका अभिलेख कक्षात वर्ग करावी असे आदेश पारित केलेले आहेत.

## बीडवर

शहरातील शहेंशाह नगर, लक्ष्मण नगर, इकबाल कॉलनी, लेंडी रोड, मोमीनपुरा, धांडे नगर, जालना रोड या भागांमध्ये अनेक ठिकाणी घरामध्ये पाणी शिरले आहे. आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम हे गुडघ्याएवढ्या पाण्यातून शहरातील विविध भागात मदत करण्यासाठी फिरत आहेत. पोलीस अधिक्षक नवनीत काँवत आज पहिल्यांदाच पुरस्थितीची पाहणी करण्यासाठी हातात छत्री घेऊन रस्त्यावर उतरले आहेत. त्यांनी जुना बाजार येथे भेट देऊन दगडी पुलावरून जात असलेल्या पाण्याची, तेथील उघड्या डि.पी.ची पाहणी केली. त्यांनीही नागरीकांना सतर्कतेचा आवाहन केले आहे. दरम्यान बीड जिल्ह्यातील अतिवृष्टी ग्रस्तांना शासनाने दहा किलो तांदुळ आणि दहा किलो गहू मोफत देण्याच्या घेतलेल्या निर्णयाची आज बीडमधुन प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली आहे.आ.संदीप भैय्या क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम, तहसीलदार चंद्रकांत शेळके, माजी सभापती खुर्शीद आलम, तालुका पुरवठा निरीक्षक प्रशांत सुपेकर, श्रीराम वायभट, अव्वल कारकुन संतोष मुळीक, मंडळ अधिकारी तांदळे, अमिन जमा यांनी मोमीनपुरा, बार्शी नाका या भागात जावून स्वस्त धान्य दुकान क्र.२७ व इतर दुकानातून अतिवृष्टी ग्रस्त कुटूंबियांना दहा किलो तांदुळ आणि दहा किलो गहू वाटप करू भर पावसात मदतीचा हात दिला.

## मुडेगाव येथे भिंत

होते. वाटेतच एक बंद अवस्थेत असलेले दगडी बांधकाम असलेले जुने घर आहे. मागील काही दिवसांपासून अंबाजोगाई तालुक्यात पावसाची संततधार चालू आहे. दररोज पडणाऱ्या पावसाने दगडी बांधकाम असलेले घर कोसळल्या गेले. घराच्या बाजूने जात असताना या घराच्या भिंतीखाली संदीपान अडसूळ हे दबल्या गेले तर शेशाबाई जगताप यांच्या पायावर दगड पडल्याने त्यांच्या पायाला दुखापत झाली.

भिंतीखाली दबल्या गेलेले संदीपान अडसूळ हे कमरेपासून खाली भिंतीखाली दबल्या गेले. त्यांच्या अंगावर पडलेले दगड काढताना त्यांना अक्षरशः ओढून काढावे लागले. त्यांना तातडीने अंबाजोगाई येथील स्वा रा ती येथे उपचारासाठी दाखल केले असून त्यांच्यावर पुढील उपचार केले जात आहेत. दरम्यान शेषाबाई जगताप यांना जवळच असलेल्या धानोरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करन त्यांच्या पायाला तीन ते पाच टाके घालून त्यांना घरी पाठवण्यात आले. दरम्यान अंबाजोगाई तालुक्यात पडत असलेल्या संततधार पावसामुळे संपूर्ण तालुक्यातील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. गावातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतात पाणीच पाणी झाले असून अनेकांची पिके तसेच शेतातील माती वाहून गेली आहे.